ग्राम पंचायतींनी त्यांच्या उत्पन्नातील
१५ टक्के भाग मागास वर्गीयांच्या उन्नतीसाठी
खर्च करणे.

---

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्र. विसप्र-१०९२/सीआर-३९३३/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २० एप्रिल १९९२.

वाचा/पहा : १) शासन परिपत्रक क्र.ग्रा.वि.वि.क्र.व्हीपीएम-२६७६/
२३९६/२३, दि. ३० सप्टेंबर, १९७६.
२) शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र.व्हीपीएम-२६८०/
५६२८/सीआर-६१४/२३-ब, दि. २९-४-८०.
३) शासन आदेश क्र.ग्राविवि १०८९/प्र.क्र.१०५३/२१-अ,
दिनांक १८-११-१९८९.

## शासन परिपत्रक

ग्राम पंचायतींनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के रक्कम प्रतीवर्षी मागास वर्गीयांच्या उन्नतीसाठी खर्च केला पाहिजे असे धोरणात्मक आदेश वर दर्शविलेल्या शासन परिपत्रक/आदेशान्वये देण्यांत आलेले आहे. हा खर्च कसा करावा, १५ टक्के तरतूदकरीत असतांना त्यामध्ये कोणकोणत्या बाबी विचारात घेण्यात याव्यात, खर्च कोणकोणत्या बाबीवर करण्यांत यावा व कोणकोणत्या बाबीवर करण्यांत येऊ नये या संबंधीच्या आवश्यक त्या सूचना उपरोक्त शासन आदेशान्वये सर्व जिल्हा परिषदांना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, जिल्हयातील बहुसंख्य ग्राम पंचायती आपल्या उत्पन्नाच्या १५ टक्के हिस्सा मागास वर्गीयांच्या उन्नतीसाठी करण्याबाबतची तरतूद आपल्या अर्थसंकल्पात करीत नाहीत. तसेच अर्थसंकल्पांत तरतूद करतांना मागील अनुशेषही विचारात घेत नाही. तसेच ही जी तरतूद केलेली असते, ती त्या त्या वित्तीय वर्षांत खर्च केला जात नाही. परिणामी अनुशेष वाढत जातो. त्याचप्रमाणे केला खर्च हा शासनाच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणेदेखील केला जात नाही.

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ६२ (२) अन्वये, ग्राम पंचायतींच्या अर्थसंकल्पास पंचायत समिती मान्यता देते. ही तरतुद विचारांत घेऊन, पंचायत समितींनी सदर अर्थसंकल्पास मान्यता देण्यापूर्वी ग्राम पंचायतींनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या १५ टक्के तरतूदीची रक्कम मागील वित्तीय वर्षांत मागास वर्गीयांसाठी खर्च केली आहे किंवा कसे हे साकल्याने विचारात घेतल्यानंतरच त्या ग्राम पंचायतीच्या

8632



Panch... 
... MAY 1992

अर्थसंकल्पात पंचायत समितींनी मंजूरी देणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात असे घडत नसल्याने बरीच अनुशेषाची रक्कम प्रलंबित आहे. तरी सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ही बाब त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व पंचायत समित्यांच्या गट विकास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देवून अनुशेषाची रक्कमेचा निपटारा त्वरीत होईल या बद्दल कार्यवाही करण्या बाबत सूचना द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

( अ.कृ.जगताप )

कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग.

प्रति,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

-x-x-x-x-x-x-x-x-x-x-x-

महत्वाचे.

जा.क्र.ग्रापं २/आरआर/५७१/९२

जिल्हा परिषद,जळगांव. दि.३०।४।९२

प्रति,

गट विकास अधिकारी,

पंचायत समिती ----मुक्ताईनगर----------

२/- सोबतचे शासनाचे परिपत्रका प्रमाणे सर्व ग्राम पंचायतींना त्यांचे उत्पन्नाचे १५ टक्के भाग मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी मागिल अनुशेषासह खर्च करणे बाबतच्या सक्त सूचना द्याव्यात.

३६२
१३-५-९२

(सही)

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, जळगांव करीता.

Scanned with CamScanner